## दुःखी कविता

माझ्या दुःखी कविता वाचून तो म्हणाला....
कविता चांगली आहे,
पण वाचून उदासते मन,
असेही tension चे दिवस...
काहीतरी हसवणारे म्हण !

तिकडे आतंकवादी,
इकडे economy ची वाट..
चांगल्या company त असलो
तरी layoff झालेत already साठ !

( नाही, म्हणजे तसं
बरं चालू आहे...
थोडंसं saving आणि
manager शी ही सूत आहे.. ) तरीही...

खरं सांगतो असल्या वैतागात,
नको वाटते तुझी उसासणारी कविता..
अगदी विडंबन-हास्य नको..
पण, हलक्या २-४ ओळी येतील की लिहिता !

'रागावू नकोस.....'
असेही शेवटी म्हणाला...
खांद्यावर थोपट्ल्यासारखं करीत,
मग तो ही तिथून पळाला !!

खरंच सांगते मित्रा,
माझ्या मनातलंच बोललास....

पण निर्दोष लोकांची हत्त्या बघून,
नेत्यांची विचित्र सत्ता बघून,
धर्माच्या नावाची लक्तरे बघून,
अन गुन्हयांनी भरलेली दफ्तरे बघून..
माझी लेखणी जेंव्हा रडते ना...
तेंव्हा दुःखी कविताच ढाळते रे,
दुःखी कविताच ढाळते !!!!

**- प्रीती देशपांडे**
**www.meetipreeti.com**